महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे इत्यादिबाबत...

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक - २८ ऑगस्ट, २०२५

संदर्भ :-राज्य निवडणूक आयोगाचे सम क्रमांकाचे दि.०६ ऑगस्ट, २०२५ रोजीचे आदेश.

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांकरीता प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे किती प्रभाग राहतील याची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने राज्यात विभागवार आढावा बैठका घेतल्या असता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठी राज्यात उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत असे निदर्शनास आले.

आणि ज्याअर्थी उपलब्ध असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या व एकाच वेळी होणाऱ्या सर्व निवडणुका या बाबींचा विचार करता आगामी निवडणुकांकरीता किती प्रभागांकरीता एक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात यावा यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे. :-

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधिन आदेशातील मुद्दा क्र. १ व २ येथे मध्ये नमूद केलेली निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे नेमून द्यावयाची प्रभागांची संख्या खालील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे. :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता १० ते १२ प्रभागांसाठी एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

२) राज्यातील इतर ( बृहन्मुंबई व्यतिरिक्त ) महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता शक्यतो ३ प्रभागांकरीता व अपवादात्मक परिस्थितीत ४ प्रभागांकरीता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) २८/०८/२०२५
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
२. सर्व विभागीय आयुक्त.
३. सर्व जिल्हाधिकारी.
४. सर्व महानगरपालिका आयुक्त.
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने.
६. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
७. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
८. निवड नस्ती.